उप जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देणेबाबत... (नाशिक विभाग)

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
शासन आदेश क्र. पदोन्न-०३२२/प्र.क्र.२६/ई-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०५ जून, २०२३

**संदर्भ**:- १) महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. पदोन्न-०३२२/प्र.क्र.२६/ई-२, दि.२०.०४.२०२३
२) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.४९/कार्या-१२, दि.१४.०७.२०२१
३) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.सेवाज्ये-१३१९/प्र.क्र.१०३/ई-३, दि.१२.०६.२०१९

**शासन आदेश:-**

संदर्भाधीन क्र. १ येथील शासन आदेशान्वये तहसिलदार संवर्गातील अधिका-यांना वेतनश्रेणी एस-१९- (रू. ५५१००-१७५१००) उप जिल्हाधिकारी संवर्गात वेतनश्रेणी एस-२०- (रू. ५६१००-१७७५००) या संवर्गात आदेशातील नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०२१ विचारात घेऊन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात आलेल्या अधिका-यांना खालील तक्त्यात स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे महसूली विभाग वाटपानुसार स्तंभ क्र.५ येथे दर्शविल्याप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | से.ज्ये.क्र. | महसूल विभाग वाटप | पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्री. शिवकुमार मनोहर आवळकंठे | ११९२ | नाशिक | **जिल्हा पुनर्वसन अधिकारी, नंदुरबार** या श्री. नितीन सदगीर यांच्या प्रस्तावित बदलीने रिक्त होणा-या पदावर |
| २. | श्री. शशिकांत बिभीषण गायकवाड | १२९१ | नाशिक | **विशेष भूसंपादन अधिकारी-१, अताप्रह, जळगांव** या रिक्त पदावर |

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | से.ज्ये.क्र. | महसूल विभाग वाटप | पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ३. | श्री. प्रमोद किसन हिले | १२१६ | नाशिक | **उप विभागीय अधिकारी, चाळीसगाव, जि.जळगाव** या श्री. लक्ष्मीकांत साताळकर यांच्या प्रतिनियुक्तीने रिक्त होणा-या पदावर |
| ४. | श्री. गजेंद्र नरेंद्र पाटोळे | १२३७ | नाशिक | **जिल्हा पुर्नवसन अधिकारी, जळगांव** या श्री रविंद्र भारदे यांच्या प्रस्तावित बदलीने रिक्त होणा-या पदावर |

२. उपरोक्त अधिका-यांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटपाबाबतच्या अधिसूचना विचारात घेऊन महसूली विभाग वाटप करण्यात येत आहे.

३. सदर पदोन्नतीचे आदेश प्राप्त झाल्यापासून संबंधित अधिका-यांना शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये.

४. सदर पदोन्नतीने पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्यासाठी सध्याच्या पदावरील कार्यभार कार्यालय प्रमुखाच्या सल्ल्याने तात्काळ अन्य अधिका-यांकडे सुपुर्द करुन पदोन्नतीने देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या पदावर रुजू व्हावे.

५. या आदेशान्वये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदावर १५ दिवसाच्या आत रुजू न झाल्यास संबंधित अधिका-यांना पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

६. तहसिलदार संवर्गातून उप जिल्हाधिकारी या संवर्गात पदोन्नत झालेल्या उपरोक्त अधिका-यांनी पदस्थापनेच्या पदावर रुजू होऊन कार्यभार स्वीकारल्यानंतरच उपजिल्हाधिकारी एस-२०- (रू. ५६१००-१७७५००) या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय राहतील.

७. महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. पदोन्न-०३२२/प्र.क्र.२६/ई-२, दि.२०.०४.२०२३ नुसार निश्चित केलेल्या अटी व शर्ती या कायम लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. माधव वीर)
**शासनाचे सह सचिव**

**प्रति,**

सर्व विभागीय आयुक्त.

Scanned with OKEN Scanner

प्रत,

- मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- संबंधित जिल्हाधिकारी.
- प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
- संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
- संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
- संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
- अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- संबंधित उप जिल्हाधिकारी (संबंधित विभागीय आयुक्त, यांचेमार्फत).
- सह सचिव (ई-२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- निवडनस्ती (ई-२).

Scanned with OKEN Scanner